# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१०२०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com


जा. क्र. पमपा / घकवि/२०२१/ प्रक्र.३ / २० /२०२१ दिनांक : ०८/०८ /२०२१

## आरोग्य विषयक ना हरकत दाखला

प्रती,
प्राचार्य,
बालभारती पब्लीक स्कुल,
प्लॉट नं. ०५, सेक्टर- ०४, खारघर ४१०२१०

विषय – आरोग्य (sanitation)विषयक ना हरकत दाखला.
संदर्भ – १) आपला दिनांक २२/०३/ २०२१ चा अर्ज.
२) सर्वसाधारण सभा दिनांक १३/७/२०१८ ठराव क्रमांक १६ .

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये खालील अटी व शर्तीस अधिन राहुन आरोग्य विषयक ना हरकत दाखला देणेत येत आहे.

### अटी व शर्ती

१) शाळे मध्ये बालकामगार कामावर ठेवता येणार नाहीत.
२) शाळे करीता व्यावसायिक(commercial) नळ जोडणी करणे आवश्यक आहे.
३) Fire extinguisher बसविणे आवश्यक आहे.
४) शाळे मध्ये निर्माण होणारा घनकचरा ओला व सुका असा वर्गिकृत करणे बंधनकारक असेल.
५) पनवेल महानगरपालिकेचे कर वेळच्या वेळी भरणे आवश्यक आहे. अन्यथा सदरचा ना हरकत दाखला रदद करण्यात येईल.
६) शाळे मध्ये धुम्रपान निषेधाचा फलक मराठी व इंग्रजी मध्ये लावावा.
७) सदर शाळे मध्ये खाद्यपदार्थ बनविणे व त्यांची विक्री करणे वा तदअनुशंगिक बाबींकरीता अन्न व औषध प्रशासन विभागाची परवानगी /प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
८) सदर शाळे करीता अग्नीशमक दलाचा ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
९) घनकचरा व्यवस्थांपन अधिनियम २०१६ नुसार घनकच-याचे व्यवस्थापन न केल्यास सदरचा ना हरकत दाखला रदद करण्यात येईल.
१०) शाळे मधील कँटीन मध्ये तयार करण्यात येणारे खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांच्या/नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक असल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा ना हरकत दाखला रदद करण्यात येईल.
११) खोटी कागदपत्रे किंवा चुकीची माहीती सादर करून ना हरकत दाखला प्राप्त केल्यास सदरचा दाखला रदद करण्यात येईल.
१२) सदरचा ना हरकत दाखला ८५८९.५६ चौ.मी.इतक्या क्षेत्रफळा करीता देण्यात येत आहे.

PRINCIPAL
BAL BHARATI PUBLIC SCHOOL
KHARGHAR, NAVI MUMBAI

१३) सदरचा ना हरकत दाखला हा **बालभारती पब्लीक स्कुल, प्लॉट नं. ०५, सेक्टर- ०४, खारघर ४१०२१०** हे केवळ आरोग्य विषयक बाबींकरीता योग्य असल्यामुळे देण्यात येत आहे.या व्यतिरीक्त इतर मुददयांबाबत संबंधितांनी त्या त्या विभागाशी संपर्क साधुन आपल्या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या प्राप्त करुन घ्याव्यात.

१४) सदरच्या ना हरकत दाखल्याचे दरवर्षि नूतनीकरण करण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील.

१५) आरोग्य विषयक ना हरकत दाखला हा मालमत्तेच्या अधिकृततेचा पुरावा नाही.

१६) अधिनियमातील वेळोवेळी विहीत केलेल्या अन्य अटी व शर्ती यांचे यथोचित अनुपालन करणे हे शाळा व्यवस्थापनावरअवलंबुन राहील.

१७) सदर ना हरकत दाखल्याची मुदत दि. ०७/ ०४ /२०२२या कालावधी पर्यंतच राहील.

सदर अटींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील

PANVEL CITY MUNICIPAL CORPORATION * PANVEL - RAIGAD * पनवेल शहर महानगरपालिका पनवेल - रायगड

धैर्यशील जाधव

(धैर्यशील जाधव)
सहायक आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

Secretary / Chairman

PRINCIPAL
BAL BHARATI PUBLIC SCHOOL
KHARGHAR, NAVI MUMBAI